(575)

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स-II, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-३/झोपुआ/३३६ /२०२३
दिनांक : १८/०५/२०२३

झोपडपट्टी निर्मुलन आदेश

**(महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३(ड) सह कलम १२ अंतर्गत अंतिम आदेश)**

<u>प्रस्तावना -</u>

स.नं. १४१पै, १५१पै, स.नं.३६पै, सि.स.नं.५९९३पै, ५९९६पै, ५९९९पै, ६०००पै, ६००१पै व ६००६पै लालटोपीनगर, मोरवाडी, पिंपरी पुणे येथील अनुसूचीत नमूद केलेल्या क्षेत्रासंदर्भात महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम १२ अंतर्गत खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करण्यात येत आहे.

(१) ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(ड) मध्ये नमूद तरतुदीनुसार झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र म्हणून घोषीत करणेकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे हे सक्षम आहेत; आणि

(२) ज्याअर्थी, अनुसुचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची पूर्वसूचना प्रकरणातील सविस्तर पार्श्वभूमी नमूद करुन महाराष्ट्र शासन राजपत्र दि.०३-९ नोव्हेंबर २०२२, पान नं.२२ वर आणि दि.०१/११/२०२२ च्या लोकमत वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करणेत आली असून सदरची पुर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसून येईल अशा प्रकारे योजनाक्षेत्रात दि.०७/११/२०२२ रोजी डकवून प्रसिद्ध करण्यात आली आहे; आणि

(३) ज्याअर्थी, उपरोक्त पूर्वसूचनेतील नमूद ३० दिवसांच्या कालावधीत सदर क्षेत्रातील प्रत्येक झोपडी पाडून त्याखालील क्षेत्र मोकळे करून ती जागा विकसक यांच्या ताब्यात देण्यास फर्मावण्यात आले होते. त्याअनुषंगाने विकसक यांनी योजनेतील एकूण १०२६ झोपडयांपैकी फक्त ब्लॉक सी मधील क्षेत्र रिकामे करून त्या ठिकाणी बांधकाम करण्याचे आमचे नियोजन आहे. त्यामुळे आम्ही ब्लॉक् सी मधील एकूण झोपडया संख्या १७२ झोपडीधारकांशी भाडेकरारनामा करून त्यांच्या झोपडया आमच्या जबाबदारीवर रिकाम्या केलेल्या आहेत व उर्वरीत ब्लॉक मधील झोपडीधारकांची संक्रमण शिबीर व्यवस्थेबाबत पुढील कार्यवाही करण्याची संपूर्ण जबाबदारी आमची राहील. तरी कृपया प्राथमिक ३(ड) ला अनुसरून संपूर्ण क्षेत्राकरीता अंतिम ३(ड) आदेश पारीत करण्यात यावा असे दि.११/०५/२०२३ रोजीचे हमीपत्र दाखल केलेले आहे; तथापि, संबंधित विकसक यांनी प्रस्तावित क्षेत्राची नोंद असलेली सुधारीत मालमत्ता पत्रके बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र मागण्यापूर्वी या कार्यालयात सादर करणे बंधनकारक राहील.त्या अनुषंगाने

विकसक मे.गोयल गंगा प्रमोटर्स यांनी सुधारीत मालमत्ता पत्रके बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र देण्यापूर्वी दाखल करू असे दि.१२/०५/२०२३ रोजीचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. आणि

(४) ज्याअर्थी, सदर क्षेत्रावरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबतच्या कार्यान्वयना संदर्भात कोणताही प्रतिबंधात्मक आदेश नसल्यामुळे व झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसंदर्भातील परिस्थिती अस्तित्वात असल्याने सदर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रातील झोपड्या पाडून सदरचे क्षेत्र रिकामे करणेबाबत पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे;

त्याअर्थी, उपरोक्त परिस्थितीचे अवलोकन करता महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ अधिनियमातील कलम ३(ड) सह कलम १२ च्या तरतुदीनुसार सदर क्षेत्र झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र म्हणून घोषीत करण्यासंदर्भातील अंतिम आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश :-**

१) सदर झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र घोषीत करण्यासंदर्भातील दि.१४/१२/२०२२ रोजीच्या पूर्वसूचना आदेशामधील सर्व शर्ती-अटी लागू राहतील या निर्देशासह सदर आदेश कायम करण्यात येत आहे.

२) उक्त अधिनियमाच्या कलम १२(८) अन्वये उपरोक्त नमूद मुदत संपण्यापूर्वी इमारत पाडून टाकण्यात आली नसल्यास इमारतीत प्रवेश करण्याचे व इमारत पाडून टाकण्याचे तसेच इमारतीमधील सामानाची विक्री करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अथवा त्यांनी प्राधिकृत करतील अशा अधिका-यास राहतील.

३) कोणत्याही झोपडीधारकाने विहीत मुदतीत त्याची झोपडी रिकामी न केल्यास / झोपडीधारकाची योजनेस संमती नसल्यास / झोपडीधारकास योजना मान्य नसल्यास अशा प्रकरणी पात्रता धारण केलेली असली तरीही असा झोपडीधारक, उक्त अधिनियमाच्या कलम ३झ अन्वये त्याचा पुनर्वसनाचा अधिकार गमावून कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील.

४) सदर झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्रात कोणासही कोणत्याही प्रकारचे अनधिकृत बांधकाम करता येणार नाही व अशी बाब निदर्शनास आल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता असे बांधकाम पाडणेत येईल.

५) सदरच्या आदेशाचे पालन करण्यास कसूर करणारी कोणतीही व्यक्ती अपराधसिध्दीनंतर उक्त अधिनियमातील कलम ३७ अन्वये, ३ महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा १००० रूपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्हीस पात्र राहील.

६) सदरच्या आदेशाविरोधात उक्त अधिनियमाच्या कलम ३-ड सह कलम १२ (४) मधील तरतुदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांच्या आत मा.शिखर तक्रार निवारण समिती, महाराष्ट्र शासन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड, बांद्रा (पुर्व), मुंबई -४०००५१ यांचे कार्यालयात अपिल दाखल करणे शक्य आहे.

577

**झोपडपट्टीचे नाव :** स.नं.१४१पै, १५१पै, स.नं.३६पै, सि.स.नं.५९९३पै, ५९९६पै, ५९९९पै, ६०००पै, ६००१पै व ६००६पै, लालटोपीनगर, मोरवाडी, पिंपरी पुणे.

**महानगरपालिका क्षेत्र :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

**अनुसूची**

| स.नं./ सि.स.नं. | जमीन/ भोगवटदाराचे हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ.मी.) (त्रिमिती पध्दतीने प्रत्यक्ष जागेवरील मोजणीनुसार) | योजना क्षेत्राची चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पूर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| स.नं.१४१पै, १५१पै, स.नं.३६पै, सि.स.नं. ५९९३पै, ५९९६पै, ५९९९पै, ६०००पै, ६००१पै व ६००६पै | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व पिंपरी चिंचवड मनपा | २३७४८.२५ चौ.मी. | लागू नाला | स.नं.१५१ पै व सि.स.नं. ५९९३ पै, ५९९६ पै, ५९९९ पै , ६००० पै. | लागू रस्ता | लागू स.नं.१४१ पै, स.नं.३६ पै, सि.स.नं. ६००१पै, ६००६ पै |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देणेत आला आहे.

**स्थळ :-** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.

**दिनांक :-** १७/ ५ /२०२३

S.R.A. Pune
No.: 297/2023
Date: 16-05-2023

(नीलेश र. गटणे), ( भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.
16.5.2023

**कार्यवाहीस्तव प्रत -**

१) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, टेल्कोरोड, अण्णासाहेब नगर, चिंचवड, पिंपरी चिंचवड, पुणे -१९- यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सादर.

२) मा. आयुक्त, महानगरपालिका आयुक्तालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका - यांना माहितीस्तव सादर.

३) मा,जिल्हाधिकारी . जिल्हाधिकारी कार्यालय पुणे ,- यांना माहितीस्तव सादर.

४) विकसक मे. गोयल गंगा प्रमोर्टस- यांना पुढील कार्यवाहीस्तव सादर.